**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक २० जानेवारी २०१९**

**विजापूर नाका पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ४०/२०१९ भादविसंक ३७९,१४३,१४७,१४९,३३२,३५३,३५६,३५७,३५८,४२७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | १९/०१/२०१९ रोजी ११.०० वा चे ब्रिजधाम वृध्दाश्रम समोर विजापूर सोलापूर हायवे रोडवर सोरेगाव सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | १९/०१/२०१९ रोजी २२.११ वा |
| फिर्यादी | : | पोशि/६८९ योगेश विठ्ठल येवले ने.पोलीस अधिक्षक सो,विशेष शाखा पथक सोलापूर ग्रामीण |
| आरोपीचे नांव | : | १) दशरथ सोमण्णा भोसले २) रवी भरले ३) तम्मा दत्तु ४) दीपक भरले ५) राहुल शिंदे ६) पप्पु खडाखडे ७) शिवा स्वामी ८) सिध्दु खडाखडे ९) राम चनप्पा भरले १०) सिध्दाराम संगप्पा संगोळगी व इतर दोन ते तीन इसम |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी व सोबत श्री.तांबे सो,व कर्मचारी असे अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्याकरीता मिळालेल्या खात्रीशीर बातमीनुसार तुकाराम राजाराम रजपुत रा.समशापुर यांच्या वस्तीजवळ फिर्यादी हे गेले असता नदीकडील बाजुने एका पाटोपाठ दोन वाळुने भरलेले टेम्पो येताना दिसले व त्या टेम्पोतील चालकांनी फिर्यादीस पाहताच उडी मारून पळुन गेले.त्यातील एक चालक नामे सिध्दाराम संगप्पा संगोळगी यास व पकडलेले दोन्ही टेम्पो ताब्यात घेवुन त्यावर कारवाई करण्याकरीता टेम्पो घेवुन जात असताना नमुद आरोपीतांनी फिर्यादी घेवुन जात असलेल्या टेम्पोसमोर येवुन टेम्पोचालक नामे संगप्पा संगोळगी यास टेम्पोमधुन खाली खेचुन घेतले त्यामुळे फिर्यादी हा खाली उतरून त्या आठ ते दहा इसमांना ओळख सांगितले तरी सुध्दा त्या आरोपीतांनी ड्रायव्हर सिध्दाराम संगोळगी ने फिर्यादीचे काही एक न ऐकता फिर्यादीस धक्काबुक्की करून फिर्यादीस मारहाण करून सदर टेम्पो कारवाई करण्याकरीता घेवु जात असताना त्या टेम्पो मधील मागे असलेल्या पथकातील कर्मचारी हे फिर्यादीस मदतीला आले त्यांनाही नमुद आरोपीतांनी धक्काबुक्की करू लागले व त्यापैकी कोणीतरी एकाने पोशि/१४०८ बेल्लाळे यांना दगड मारल्याने त्यांच्या हातावर दगडांचा मार लागला व त्यापैकीच आणखी एक इसमाने फिर्यादीस दगड मारल्याने फिर्यादीच्या कपाळावर लागुन फिर्यादीस मुक्का मार लागला व खरचटले असुन त्याचवेळी नमुद इसमांनी व टेम्पोचालक सिध्दाराम संगप्पा संगोळी याने एमएच-१७-सी-५६७२ या क्रं.च्या टेम्पोस जबरदस्तीने फिर्यादीच्या ताब्यातुन घेवुन गेले तपास:- सपोनि/वाबळे |